# २६.विद्वत संपदा हक्क व मानव संसाधन विकास

वैश्विक संस्कृती, वैश्विक मूल्य, विश्व सांस्कृतिकता, विश्वैक्य ह्या वैश्विक मूल्यांचे विश्वाला दान देणारा भारत हा मौलिक विचारांची खाण आहे. ही सर्व संपदा भारताची आत्मिक, बौद्धिक संपदा आहे. तिचे हनन झालेले आम्ही कदापि सहन करणार नाही. ह्या संपदेच्या स्वामित्वाबाबत, सुरक्षिततेबाबत आम्ही कटिबद्ध आहोत. आपण ज्याला आधुनिक ज्ञानशाखा संबोधतो त्याचा उगम भारतीय ज्ञानपरंपरेत आहे. भारतीय संस्कृतीची ही परंपरा, ही संपदा रक्षण करण्याची आवश्यकता आहे. भारतीय संशोधक, विचारवंत, कलावंत यांच्याकडे आज जगभरातून पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. आज संपूर्ण विश्व सकारात्मक अपेक्षेने भारताकडे बघत आहे. आजचे युग हे ज्ञान व विज्ञान व तंत्रयुगाचे युग आहे. आज ज्ञानाचा प्रस्फोट झाला आहे. म्हणून 'विद्वत संपदा हक्क व मानव संसाधन विकास' या विषयावर विविध विचार होणे अनिवार्य आहे.


आजही शिक्षणक्षेत्रात विद्वत संपदा हक्क हा शब्द दुर्लक्षित आहे. औद्योगिक क्षेत्राच्या बाबतीत पेटेंट Security, Trade Mark हे शब्द नवीन नाही. पण शिक्षणाच्या क्षेत्राच्या बाबतीत I.P.R. इ. विषय कसे Relate करता येतील? शिवाय शिक्षणाच्या क्षेत्रात आता जागतिकीकरणाच्या लाटेत सहभागी होण्याचा निर्णय भारताने घेतला आहे. अर्थात शिक्षणक्षेत्र हे आता जागतिक स्तरावर एकत्र येणार! हा सगळा विचार करता Human Product बद्दलचा एक नवीन दृष्टिकोन आता शिक्षणातून निर्माण होण्याची आवश्यकता आहे. पण त्याकरिता सर्वप्रथम शैक्षणिक क्षेत्रात जागृती निर्माण होण्याची आवश्यकता आहे. कारण ज्ञानाच्या दृष्टिकोनातून जेव्हा जेव्हा भारताचा विचार होतो तेव्हा डोळ्यांसमोर येतो तो प्राचीन भारत व प्राचीन भारतात निर्माण झालेले ज्ञानसाहित्य. श्रुती, स्मृती, वेद, उपनिषदे, ह्या साहित्याच्या बाबतीत असे म्हणता येईल की, अखिल जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राला, प्रत्येक अंगाला स्पर्श करणारे हे ज्ञान आहे. एवढेच नाही, तर ज्या ज्या म्हणून आम्ही आधुनिक ज्ञानशाखा मानतो त्याचा उगम प्राचीन ज्ञानात सापडतो आणि ही आमची विद्वत संपदा वैश्विक आहे. आज जेव्हा जेव्हा आम्ही बहुसांस्कृतिकता, विश्वधर्म, वैश्विक मूल्य, मूलभूत मूल्य, सहअस्तित्व, शांतता, प्रेम, Wisdom हे शब्द उच्चारतो त्याचे उगमस्थान आमच्या प्राचीन विद्वत संपदेत आढळते. विद्वत संपदेची आमची परंपरा उज्ज्वल आहे. एवढेच नाही, तर ह्या ज्ञानप्रवाहात आज नवनवीन विचारांची भर पडत आहे.

ह्या ठिकाणी डॉ. रघुनाथ माशेलकरांच्या वाक्याची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. ते म्हणतात, २१ वे शतक हे ज्ञानाचे तसेच मानवी मनाचे शतक असेल. आता खरोखरच ज्ञानाचा प्रस्फोट झाला आहे. नित्यनूतन होत आहे, पण त्याचबरोबर ज्ञानाच्या अवैध वापराचा धोका निर्माण झाला आहे. 'Lifting-Shifting' ही मनोवृत्ती वाढल्यामुळे ज्ञानाच्या अवैध वापराचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे ज्ञानाचे स्वामित्व हक्क, सुरक्षितता ह्या बाबींना आज महत्त्व प्राप्त झाले आहे. असे असेल तर नवीन ज्ञान निर्मितीची प्रक्रिया सुरू राहील, शिवाय ह्यामुळे मानव संसाधनाची गुणात्मकता वाढू शकेल. ह्या सर्व बाबी मनावर बिंबित करायच्या असतील तर आता शिक्षणाच्या ध्येयामध्ये परिवर्तन घडवून आणावे लागेल. 'विद्वत संपदा व विद्वत संपदा हक्क' याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती निर्माण करणे, ह्या शिक्षणाच्या ध्येयाबाबत आता शिक्षणतज्ज्ञांना विचार करावा लागेल. यासाठी वेगळा कृतीगट स्थापन करून एक कृती आराखडा तयार करणे, ही आजच्या काळाची गरज आहे. शिक्षणाबाबत विचार करताना महात्मा गांधींच्या व स्वामी विवेकानंदांच्या वाक्याची प्रेरणा व गीतावचनाचे त्याला असलेले अधिष्ठान – शिक्षणाबाबत महात्मा गांधी म्हणतात, "Literacy is not end of education, not even beginning. By education I mean drawing out of best in man's body, mind and soul." अर्थात मानवी बुद्धी, मन व आत्मा ह्यांच्या सर्वोत्कृष्टतेची अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण. स्वामी विवेकानंद म्हणतात, "Education is Manifestation of Perfection." अर्थात मानवातील पूर्णत्वाची अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण. हे पूर्णत्वच प्रगट होण्यासाठी मानवाचे आत्मिक बल व मानवी मेंदू ह्या दोन बाबी महत्त्वाच्या आहेत. ह्या सर्वांना घडविणारे दोन हात व त्याला असलेले आध्यात्मिक ज्ञानाचे वलय, ही आमची विद्वत संपदा. गीतेच्या दहाव्या अध्यायात जेव्हा अर्जुनाने, अर्थात शिष्याने गुरूला म्हणजे श्रीकृष्णाला आपल्या विश्वसंपदेचा उगम, त्याची अभिव्यक्ती ह्याबाद्दल भारावून जाऊन ह्या मागील असणाऱ्या अधिष्ठानाची पृच्छा केली त्यावेळी गुरूने शिष्योत्तमाला सांगितले, 'अहं सर्वस्व प्रभावो:।' अर्थात मीच सगळ्यांचे उगमस्थान आहे. अर्थात या ठिकाणी 'मी, म्हणजे कुणी व्यक्ती नव्हे, तर समष्टी 'अहं' आहे म्हणजेच संपूर्ण विश्व चैतन्याच्या स्वरूपात अभिव्यक्त होत आहे. ही प्रतीकात्मता ह्या ठिकाणी आहे. २१ व्या शतकात मानवाचे हे चैतन्य व 'अहं सर्वस्व प्रभावो:।' मानवी मेंदूतून अभिव्यक्त केला आहे. त्याचाच विलास व विभूती आपणास सर्वत्र आढळते. म्हणून हा मानवी मेंदू हे सर्व ज्ञानाचे उगमस्थान आहे. ह्याला योग्य आकार देणारे दोन हात व ह्याला असणारी अध्यात्माची बैठक हे बोधचिन्ह अखिल विश्वाने स्वीकारल्यास शस्त्र व शास्त्र निश्चितपणे एकत्र नांदतील व त्याच दिवशी खऱ्या अर्थाने Knowledge Societyची स्थापना होऊन बहुसांस्कृतिकता, विश्वधर्म, सहअस्तित्व, Peace, Wisdom ह्या संकल्पना मूर्त रूप धारण करतील व संपूर्ण जगाच्या बाबतीत 'वैश्विक खेडे' ही संकल्पना मूर्त रूपात येऊन मा.राष्ट्रपती अब्दुल कलाम यांचे प्रत्येकाच्या आयुष्यातील पाऊलापुरत्या प्रकाशाचे स्वप्न

खरे ठरेल.

विद्वत संपदा हक्क हा विषय आजही शिक्षण क्षेत्रात अतिशय दुर्लक्षित असा विषय आहे. माहितीचा हक्क व विद्वत संपदा हक्क याबाबत विद्वत समाजात आज सर्वप्रथम जाणीव जागृती होणे आवश्यक आहे. डॉ.ह.ना.जगताप यांच्या मते प्रत्येक शिक्षण संस्थेला आपल्या Human Product बद्दलचा सुरक्षिततेचा विचार आता करावा लागणार आहे. कारण भारतानेही आता जागतिकीकरणाच्या क्षेत्रात पदार्पण केले आहे. प्रत्येक संस्थेला आपल्या Patent, Trade Mark बद्दल आता जागरूक राहावे लागणार आहे. प्रत्येक संशोधकाला आपल्या संशोधनाच्या सुरक्षिततेसंबंधी आपल्या नवनवीन कल्पनांच्यासंबंधी आता जागृत राहावे लागेल. तरच शिक्षणातून विद्वत संपदेचे संरक्षण शक्य आहे.

डॉ.शशी वंजारी यांच्या मते विद्वत संपदा हक्क. शिक्षक, विद्यार्थी व समाज याचा सहसंबंध हा खालील आकृतीवरून स्पष्ट होतो.





भारतीय समाजाची परंपरा, संस्कृती ही भारताची विद्वत संपदा आहे. तिचे जतन करताना शिक्षकाला सर्वप्रथम विद्वत संपदा हक्काची जाणीव असावी, भारतीय संस्कृतीचा, परंपरेचा त्याला अभिमान असावा. प्राचीनता व वर्तमानाचा सहसंबंध जोडता येण्याइतपत तो समर्थ असावा, तरच तो विद्यार्थ्यांमध्ये या सर्व घटकांचे संक्रमण करू शकेल. ह्याकरिता ज्ञानाचे Packaging and Presentation करावे लागेल. ह्या

सर्व बाबींसाठी जी संसाधने असतील, जे स्रोत असतील, जी गुंतवणूक ह्याकरिता करावी लागेल, ही सर्व समाजाच्या माध्यमातून घडून येईल.

विद्वत संपदा हक्काच्या संदर्भात माहिती व तंत्रज्ञानामुळे बरीचशी गुन्हेगार प्रवृत्ती आज समाजात वाढत आहे. उदा. झेरॉक्सिंग, सायबर चोरी इ. सर्वांमुळे आज IPR च्या संदर्भात नवीन आव्हाने उभी ठाकली आहेत. ग्रंथपाल ग्रंथालय अभ्यासक्रमावर याबाबत जाणीव जागृती व शिक्षणात समावेश व्हावा पण त्याचबरोबर महाविद्यालयीन स्तरावर या कायद्याविषयक जाणीव विद्यार्थ्यांमध्ये करून द्यावी.

१९९५ मध्ये WTO चे आगमन जागतिक स्तरावर झाले. वास्तविक पाहता GATT चे हे औपचारिक संक्रमण होते. १३९ सदस्यांचे असणाऱ्या WTO चा उद्देश जागतिक बाजार व सेवा यांचे उदारीकरण हा होता. आज भारतही WTO चा सदस्य आहे व TRIPचे पालन करण्याकरिता तो कटिबद्ध आहे. भारतात शाळा व महाविद्यालयातून हा विषय शिकविण्याची नितांत आवश्यकता आहे. एवढेच नाही तर आज भारतीय मेंदू विदेशात स्थानांतरित होण्यापूर्वी त्याचे संरक्षण अतिशय महत्त्वाचे आहे. आज शिक्षकांनी, पालकांनी आपल्या विद्यार्थ्यांची, पाल्याची क्षमता ओळखली पाहिजे व त्याला योग्य दिशादर्शन केले पाहिजे. अभ्यासक्रम, अध्ययन, अध्यापन प्रक्रियेतून, विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला, त्याच्या वैज्ञानिक संशोधन वृत्तीला चालना मिळाली पाहिजे. अध्ययनकर्त्यांमधील वैज्ञानिक अभिवृत्ती विकसित होण्याकरिता शिक्षण संस्थांनी त्यांना संशोधन करण्याकरिता, प्रयोग करण्याकरिता, नवीन शोध लावण्याकरिता प्रोत्साहित करावे. हे सर्व करीत असताना भारतीय संस्कृती व परंपरा ह्या शिक्षणप्रक्रियेचे Inputs आहेत हे कुणीही विसरून चालणार नाही. म्हणूनच भारताची विद्वत संपदा ही बळकट आहे. वरील सर्व सहसंबंध डॉ.उशोशी गुहा यांनी खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे.

**Flow Chart**
***IPR, WTO, INDIA, EDUCATION***



'Intellectual Property Right' ही ज्ञानशाखाच विकसित होणे ही जागतिकीकरणाच्या युगाची गरज आहे आणि हा आशय अगदी प्राथमिक स्तरापासून विकसित व्हायला हवा व अनिवार्य व्हायला हवा. ह्याच्या माध्यमातून भारताची विद्वत संपदा सुरक्षित राहायला हवी. नवीन ज्ञानाची निर्मिती व्हायला हवी. वैश्विक संस्कृती, वैश्विक मूल्य, विश्व सांस्कृतिकता, विश्वैक्य ह्या वैश्विकतेचे विश्वाला दान देणारा माझा भारत हा मौलिक विचारांची खाण आहे. ही संपदा भारताची आत्मिक संपदा आहे. तिचे हनन झालेले आम्ही कदापि सहन करणार नाही. म्हणून ह्या संपदेच्या स्वामित्वाच्या सुरक्षिततेचा प्रश्न हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. म्हणूनच शिक्षणाला आता शस्त्र उगारण्याची वेळ आली आहे.

भारत भूमी जगद्वंद्यम्
विश्वानां हृदयेश्वरम्।
विश्ववंद्यम् जनाधारम्
वंदे त्वम् जगदोत्तमम्।।